




# कृष्णा एक्सप्रेस

संपादक - गोरख काशिनाथ तावरे





✻ कराड (जि.सातारा) ✻ वर्ष – २ रे. ✻ अंक ३१ वा. ✻ गुरुवार दि.०६ ऑगस्ट २०२६ ✻ पृष्ठे ४ ✻ किंमत : १ रुपये ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610

✻ Karad (Dis.Satara) ✻ Vol - 2 ✻ Ishue - 31 ✻ Thursday 06 August 2026 ✻ Page - 4 ✻ Price - 1 Rs. ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610


## म्हाडाच्या प्रलंबित गृहनिर्माण प्रकल्पांना गती द्या

### मोठी घरांची लॉटरी लवकर जाहीर करा–उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

मुंबई : सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) प्रलंबित गृहनिर्माण प्रकल्पांना तातडीने गती द्यावी. तसेच म्हाडाची मोठी घरांची लॉटरी लवकर जाहीर करून संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक व कालबद्ध पद्धतीने पूर्ण करावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या विविध प्रकल्पांचा आणि धोरणात्मक विषयांचा आढावा घेण्यात आला. यावेळी पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे सभापती शिवाजीराव आढळराव पाटील, अधिकारी व संबंधित विभागांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सांगितले की, म्हाडाच्या स्तरावर प्रलंबित असलेले सर्व प्रस्ताव तातडीने मार्गी लावावेत. शासन स्तरावरील आवश्यक प्रशासकीय मान्यता आणि निर्णय प्रक्रियेला वेग देऊन सामान्य नागरिकांना घर उपलब्ध करून देण्यास सर्वोच्च प्राधान्य द्यावे. म्हाडाच्या लॉटरीमध्ये दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेळा प्रतिसाद न मिळालेल्या सदनिकांची 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर विक्री करावी. त्यामुळे रिक्त घरे पडून राहणार नाहीत आणि इच्छुक नागरिकांना तातडीने घरे उपलब्ध होतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

विद्यार्थी आणि नोकरीसाठी स्थलांतर करणाऱ्या महिलांच्या गरजा लक्षात घेऊन खर्चाच्या आणि खराबवाडी



म्हाडामार्फत महिला वसतिगृहे तसेच विद्यार्थी वसतिगृहे भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. बैठकीत पुणे जिल्ह्यातील शिरूर येथील १५५.२२ कोटी रुपये येथील ८९.४७ कोटी रुपये खर्चाच्या म्हाडा प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्याची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच दापोडी येथे सुमारे ८ ते १० हजार घरांचा मोठा गृहनिर्माण प्रकल्प मार्गी लावण्याबाबतही चर्चा झाली.

म्हाडाच्या २० टक्के सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेतील लाभार्थ्यांकडून विकासकांकडून आकारण्यात येणाऱ्या अतिरिक्त शुल्काच्या तक्रारींची गंभीर दखल घेऊन नागरिकांची आर्थिक पिळवणूक होणार नाही, यासाठी स्पष्ट धोरण तयार करण्याचे निर्देश देण्यात आले. याशिवाय म्हाळुंगे–इंगळे येथील प्रकल्पासाठी आवश्यक रस्ता, पाणीपुरवठा व सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाची कामे तातडीने पूर्ण करावीत, तसेच सांगली जिल्ह्यातील परवडणाऱ्या घरांच्या प्रकल्पांसाठी शासकीय जागा उपलब्ध करून द्यावी, असे निर्देशही उपमुख्यमंत्र्यांनी दिले.

## आखाडीत 'ड्रंक अँड ड्राइव्ह'ला कराड पोलिसांचा दणका

### विशेष नाकाबंदीत १५ मद्यपी वाहनचालकांवर कारवाई; ब्रेथ ॲनालायझरद्वारे तपासणी

कराड(प्रतिनिधी): आखाडीच्या पार्श्वभूमीवर शहर व परिसरात विविध ठिकाणी पार्ट्यांचे आयोजन आणि मद्यप्राशनाचे प्रमाण वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन कराड शहर पोलिसांनी 'ड्रंक अँड ड्राइव्ह'विरोधात विशेष मोहीम हाती घेतली. मंगळवारी सायंकाळी राबविण्यात आलेल्या या मोहिमेत मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्या १५ वाहनचालकांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात आली.



कोल्हापूर नाका आणि कृष्णा कॅनॉल परिसरात सायंकाळी सहा ते रात्री नऊ या वेळेत पोलिसांनी विशेष नाकाबंदी केली. या वेळी वाहनचालकांची ब्रेथ ॲनालायझरच्या माध्यमातून तपासणी करण्यात आली. मद्यप्राशन करून वाहन चालवित असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर संबंधित वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. आखाडीच्या काळात मद्यप्राशन करून वाहन चालविण्याच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलिसांकडून शहरातील प्रमुख मार्गांवर विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे. आगामी काळातही अशा प्रकारच्या कारवाया सुरूच राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अपर पोलीस अधीक्षक वैशाली कडुकर, पोलीस उप अधीक्षक राजश्री पाटील आणि पोलीस निरीक्षक दत्तात्रय दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. मोहिमेत सहायक पोलीस निरीक्षक संदीप साळुंखे, पोलीस उपनिरीक्षक संतोष जगदाळे, पोलीस उपनिरीक्षक आर. डी. देशमुख यांच्यासह सहाय्यक फौजदार मोहन जगताप, पोलीस हवालदार गोकुळ हादगे, जयवंत गोसावी, अश्विनी सूर्यवंशी, रतन चव्हाण, अमोल पवार, सत्यजीत नेवसे, सचिन साळुंखे, पोलीस नाईक महेंद्र सावंत तसेच पोलीस शिपाई शशिकांत घाडगे, प्रशांत मोहिते, अक्षय खोत, शिवनंदन नारायणी आणि आशिष पाटील यांनी सहभाग घेतला. मद्यप्राशन करून वाहन चालविणे हे स्वत:सह इतरांच्या जीवितासाठीही धोकादायक असल्याने नागरिकांनी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे. मद्यप्राशन करून वाहन चालवू नये, असे आवाहन कराड शहर पोलिसांनी केले आहे.

## सडा वाघापूर पठारावरील थार स्टंटबाजीप्रकरणी चालकावर गुन्हा दाखल;पाटण पोलिसांची कारवाई

**पर्यटकांच्या सुरक्षेसाठी कडक पावले**

पाटण : सातारा जिल्ह्यातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या सडा वाघापूर (ता. पाटण) येथील पठारावर जीवघेणी स्टंटबाजी करून सोशल मीडियासाठी रिल्स बनविणाऱ्या युवकांवर पाटण पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणे वाहन चालवून पर्यटकांच्या जीवाला धोका निर्माण केल्याप्रकरणी थार चालकाविरोधात पाटण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पाटण ते सडा वाघापूर मुख्य रस्त्यावर काळ्या रंगाची महिंद्रा थार (क्रमांक एमएच ५० यू ८७७८) अत्यंत बेदरकारपणे चालवली जात असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. या प्रकारामुळे चालकासह इतर पर्यटकांच्या जीवितास धोका निर्माण होत असल्याने पोलिसांनी स्वत:हून दखल घेत संबंधितावर कारवाई केली. पोलीस निरीक्षक निलेश तारू यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास पोलीस कॉन्स्टेबल नाकाडे करीत आहेत. गेल्या काही दिवसांपासून सडा वाघापूर पठारावरील थार स्टंटबाजीचे व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात प्रसारित होत होते. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी पठारावर बंदोबस्त वाढवून स्टंटबाजी रोखण्यासाठी उपाययोजना सुरू केल्या आहेत.

**एक व्हायरल रिल्स संपूर्ण कुटुंबाला आयुष्यभर दु:ख देऊ शकते. पर्यटनाचा आनंद घ्या; मात्र जीव धोक्यात घालू नका, असे आवाहन पाटण पोलिसांनी केले आहे. पोलिसांच्या या कारवाईचे पर्यटक व नागरिकांकडून स्वागत होत आहे.**

## दुरुस्तीनंतरही पुन्हा पाणी गळती सुरु;लाखो लिटर पाणी वाया

**(अनिल वीर)**

सातारा : पूजा कॉम्प्लेक्स परिसरातील सैनिक कार केअर ॲण्ड ॲक्सेसरीज' आणि त्यांच्या वॉशिंग सेंटरजवळ पुन्हा एकदा मोठी पाणी गळती सुरू झाली असून लाखो लिटर शुद्ध पाणी रस्त्यावर वाहून जात आहे. प्रशासनाच्या निकृष्ट कामाचा फटका पुन्हा एकदा नागरिकांना बसत आहे.



सदरच्या ठिकाणी यापूर्वीही पाण्याची गळती होत होती. त्यावर प्रशासनाकडून १७ जानेवारी २०२६ रोजी दुरुस्तीचे काम करण्यात आले होते. मात्र, हे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याचे आता उघड झाले आहे. अवघ्या काही महिन्यांतच त्याच ठिकाणी पुन्हा मोठी गळती सुरू झाली आहे. गळतीमुळे रस्त्यावर पाण्याचे डबके साचले आहे.

सर्वत्र चिखलाचे आणि घाणीचे साम्राज्य पसरले असून नागरिकांना ये–जा करताना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.त्यामुळे रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. भविष्यातील पाणीटंचाईचे संकट उभे असताना, दुसरीकडे अशा निष्काळजीपणामुळे लाखो लिटर पिण्याचे पाणी गटारात आणि रस्त्यावर वाहून जात आहे.

संबंधित पाणीपुरवठा विभाग आणि प्रशासनाने या गंभीर प्रकाराची तातडीने दखल घ्यावी. तसेच जानेवारी महिन्यात ज्या कंत्राटदाराने हे काम केले होते.त्याच्यावर कारवाई करून ही पाणी गळती कायमस्वरूपी थांबवावी.अशी संतप्त मागणी स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांकडून केली जात आहे.

तातडीने उपाय योजना न केल्यास संबंधित अधिकाराच्या तोंडाला काळे फसले जाईल.असा गर्भित इशारा रिपाइं (आंबेडकर) या पक्षातर्फे देण्यात आला आहे.यासंबंधीचे निवेदन महाराष्ट्र प्राधिकरणला देण्यात आले आहे. यावेळी भगवान कदम, रॅकेशब जाधव,दत्ता साळुंखे, धनाजी गायकवाड, बाबा घोडेस्वार, सागर गरड,अहमद मुलाणी, उमेश गायकवाड, योगेश माने, रामभाऊ मदाळे,राजेंद्र ओव्हाळ, राज चव्हाण उपस्थीत होते.

## सहकारमहर्षी स्व.जयवंतराव भोसले यांना अभिवादन



कराड : कृष्णाकाठच्या सहकार, सामाजिक, शैक्षणिक व आरोग्य विकासाचे प्रणेते आणि कृष्णा उद्योग समूहाचे शिल्पकार सहकारमहर्षी स्व. जयवंतराव भोसले (आप्पा) यांच्या १३ व्या स्मृतिदिनी त्यांना विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिवादन केले.

य. मो. कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन डॉ. सुरेश भोसले, माजी चेअरमन मदनराव मोहिते, डॉ. इंद्रजीत मोहिते, सौ. उत्तरा भोसले, श्री. पृथ्वीराज भोसले, श्री. विनायक भोसले यांच्यासमवेत कराड व वाळवा तालुक्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी, कृष्णा हॉस्पिटलच्या प्रांगणातील आप्पासाहेबांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी माजी आमदार आनंदराव पाटील, रयत सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन ॲड. उदयसिंह पाटील – उंडाळकर, राष्ट्रीय खनिज विकास महामंडळाचे संचालक भरत पाटील, ज्येष्ठ नेते डॉ. अशोक गुजर, भाजपाचे पश्चिम महाराष्ट्र संयोजक विक्रम पावसकर, कराडचे प्रांताधिकारी अतुल म्हेत्रे, तहसीलदार कल्पना ढवळे, पोलिस उपअधीक्षक राजश्री पाटील, प्रादेशिक परिवहन अधिकारी चैतन्य कणसे, कृष्णा कारखान्याचे व्हाईस चेअरमन जे. डी. मोरे, संचालक जगदीश जगताप, दयानंद पाटील, जितेंद्र पाटील, बाजीराव निकम, संग्राम पाटील आदींसह मान्यवर उपस्थित होते.

## 'कृष्णा'वर सहकारमहर्षी स्व. जयवंतराव भोसले यांना अभिवादन



शिवनगर : येथील य. मो. कृष्णा सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर सहकारमहर्षी स्व. जयवंतराव भोसले (आप्पासाहेब) यांना त्यांच्या १३ व्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. कारखान्याचे व्हा. चेअरमन जे. डी. मोरे यांच्या हस्ते व संचालक मंडळाच्या उपस्थितीत स्व. आप्पासाहेब यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी संचालक लिंबाजी पाटील, बाबासो शिंदे, बाजीराव निकम, सुनील पाटील, संग्राम पाटील, अरविंद पाटील, आनंदा खबाले, अविनाश खरात, छबन कांबळे, मॅनेजिंग डायरेक्टर बाजीराव सुतार, एम. के. कापूरकर, जयवंत शुगरचे संचालक वसंतराव पवार, दिपकनाना जाधव आदींसह मान्यवरांनी सहकारमहर्षी स्व. जयवंतरावजी भोसले (आप्पासाहेब) यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

स्व. जयवंतराव भोसले यांनी सहकार, शिक्षण आणि आरोग्य यांना केंद्रबिंदू मानून कृष्णाकाठी विकासाचे नवे पर्व सुरू केले. कृष्णा कारखान्याच्या माध्यमातून आप्पासाहेब यांनी शेतकऱ्यांच्या जीवनात समृद्धी आणली. कृष्णा उद्योग समूहाच्या माध्यमातून हजारो लोकांना रोजगार मिळाला आहे. सहकार, शिक्षण आणि आरोग्य यांना केंद्रबिंदू मानून स्व. जयवंतराव भोसले (आप्पासाहेब) यांनी कृष्णाकाठी विकासाचे नवे पर्व सुरू केले. त्यांच्या दूरदृष्टीमुळेच आज कृष्णाकाठ समृद्ध आणि सुजलाम्–सुफलाम् झाला आहे अशा भावना मान्यवरांनी मनोगतात व्यक्त केल्या. यावेळी सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## जमीन दिलेल्या प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय

मुंबई : राज्यातील सार्वजनिक प्रकल्पांसाठी खाजगी वाटाघाटीद्वारे स्वेच्छेने आपली जमीन उपलब्ध करून दिलेल्या भूमिधारकांना व त्यांच्या वारसांना प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मदत व पुनर्वसन मंत्री मा. श्री. मकरंद जाधव–पाटील यांनी घेतला आहे. सार्वजनिक प्रकल्पांसाठी ज्यांनी थेट खरेदीद्वारे जमिनी दिल्या आहेत तसेच ज्यांच्या जमिनी भूसंपादन अधिनियमांतर्गत संपादित करण्यात आल्या आहेत, त्या सर्वांनी राज्याच्या विकासासाठी आपल्या वडिलोपार्जित अथवा स्वकष्टार्जित जमिनी देऊन योगदान दिले आहे. त्यामुळे जमीन कोणत्या पद्धतीने संपादित झाली यावरून भेदभाव न करता सर्वांना समान न्याय देणे आवश्यक होते. आजपर्यंत भूसंपादन कायद्यानुसार संपादित झालेल्या जमिनींच्या मालकांना विविध सवलती व लाभ मिळत होते. मात्र, सार्वजनिक हितासाठी खाजगी वाटाघाटीद्वारे जमीन दिलेल्या भूमिधारकांना प्रकल्पग्रस्त म्हणून मान्यता



मिळत नव्हती. याबाबत विविध लोकप्रतिनिधी व प्रकल्पग्रस्त संघटनांनी शासनाकडे सातत्याने मागणी केली होती. मंत्रालयात झालेल्या बैठकीनंतर मदत व पुनर्वसन मंत्री मा. श्री. मकरंद जाधव–पाटील तसेच राज्यमंत्री

**या शासन निर्णयामुळे राज्यातील अनेक प्रकल्पग्रस्तांना नाकारण्यात आलेले अथवा प्रलंबित असलेले प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र मिळणार आहे. त्यामुळे शासन तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रकल्पग्रस्तांसाठी राखीव जागांवर नोकरीसाठी अर्ज करण्याचा अधिकारही पात्र वारसांना मिळणार आहे.**
**- मकरंद जाधव-पाटील,** मंत्री, मदत व पुनर्वसन, महाराष्ट्र राज्य

ड. आशीष जयस्वाल यांनी खाजगी वाटाघाटीद्वारे जमीन दिलेल्या भूमिधारकांनाही प्रकल्पग्रस्त घोषित करण्याचा निर्णय घेतला.या निर्णयामुळे संबंधितांना प्रकल्पग्रस्त धोरणांतर्गत उपलब्ध असलेले विविध लाभ, सवलती आणि पुनर्वसनाशी संबंधित सुविधा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# संपादकीय....

## तडजोड नाही

अन्न ही प्रत्येक नागरिकाची मूलभूत गरज आहे. मात्र, याच अन्नामध्ये भेसळ करून नागरिकांच्या आरोग्याशी खेळ केला जात असेल तर तो केवळ कायद्याचा भंग नसून समाजावरील गंभीर अन्याय आहे. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी नालॉग पनीरच्या माध्यमातून होणाऱ्या भेसळीवर कठोर कारवाईचा इशारा देत नागरिकांच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. त्यांचा हा इशारा केवळ व्यावसायिकांना धाक दाखवणारा नसून आरोग्य सुरक्षेसाठी आवश्यक असलेला संदेश आहे.दुधापासून तयार होणारे पनीर हे भारतीय खाद्यसंस्कृतीतील महत्त्वाचे खाद्यपदार्थ आहे. मात्र, काही ठिकाणी खऱ्या दुधाच्या पनीरऐवजी तेल, स्टार्च, रसायने आणि इतर घटकांचा वापर करून तयार केले जाणारे नालॉग पनीर बाजारात विकले जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. कमी खर्चात अधिक नफा मिळविण्याच्या हव्यासापोटी काही व्यावसायिक नागरिकांच्या जीवाशी खेळ करत आहेत. अशा प्रकारांना आळा घालणे ही प्रशासनाची जबाबदारी असली तरी त्यासाठी समाजाची जागरूकताही तितकीच महत्त्वाची आहे.तुकाराम मुंढे हे प्रशासनातील कर्तव्यनिष्ठ आणि शिस्तप्रिय अधिकारी म्हणून ओळखले जातात. त्यांनी यापूर्वीही नियमबाह्य कामांवर कठोर भूमिका घेतली आहे. अन्न सुरक्षेच्या बाबतीत त्यांनी घेतलेली भूमिका ही स्वागतार्ह आहे. नागरिकांना सुरक्षित आणि दर्जेदार अन्न मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. हा अधिकार हिरावून घेणाऱ्या कोणत्याही प्रवृत्तीला कठोरपणे रोखले पाहिजे.अन्न भेसळीचे परिणाम तात्काळ दिसून येत नसले तरी दीर्घकालीन आरोग्यावर त्याचा गंभीर परिणाम होऊ शकतो. लहान मुले, वृद्ध आणि आजारी व्यक्तींना अशा भेसळीचा मोठा धोका असतो. त्यामुळे केवळ कारवाई करून थांबणे पुरेसे नाही, तर नियमित तपासणी, नमुने तपासण्याची प्रक्रिया, दोषींवर कठोर दंडात्मक कारवाई आणि नागरिकांमध्ये जनजागृती या चारही बाबींवर भर देणे गरजेचे आहे.व्यावसायिकांनीही नफ्यापेक्षा ग्राहकांच्या आरोग्याला महत्त्व दिले पाहिजे. अन्न व्यवसाय हा विश्वासावर चालतो. ग्राहकांच्या विश्वासाला तडा देणाऱ्या व्यापाऱ्यांमुळे संपूर्ण व्यवसाय क्षेत्राची बदनामी होते. प्रामाणिक व्यावसायिकांनीही अशा प्रवृत्तींविरोधात आवाज उठविण्याची गरज आहे. तुकाराम मुंढे यांनी दिलेला इशारा हा केवळ नालॉग पनीरपुरता मर्यादित नसून संपूर्ण अन्न भेसळ करणाऱ्या प्रवृत्तींना दिलेला संदेश आहे. नागरिकांच्या ताटात सुरक्षित आणि शुद्ध अन्न पोहोचविण्यासाठी प्रशासन, व्यापारी आणि ग्राहक या तिन्ही घटकांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. आरोग्याशी तडजोड करणाऱ्या कोणत्याही प्रकाराला समाजात स्थान मिळता कामा नये. कठोर कारवाईसोबतच सजग नागरिकांची भूमिका हीच अन्न सुरक्षेची खरी हमी ठरेल.

## जाहीर लिलाव नोटीस

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि प सातारा व जि प बांधकाम उपविभाग कराड यांच्याकडील प्राप्त आदेशान्वये जि. प. प्राथमीक शाळा मनू येथील निर्लेखन प्राप्त ५ शाळा वर्ग खोल्यांचा साहित्याचा (डबर, पत्रा, लाकडी खिडक्या लोखंडी खिडक्या, लाकडी चौकट, लोखंडी चौकट, दरवाजे, लोखंडी अँगल, लोखंडी कैची.) जाहीर विक्री लिलाव दिनांक : १२/०८/२०२६ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मनू येथे सकाळी १०.०० वाजता नियोजित केले आहे. तरी इच्छुकांनी उपस्थित रहावे.

**लिलाव प्रक्रियेतील अटी व शर्ती**

१. संबंधितांनी नियोजित वेळेपूर्वी १ तास अगोदर प्रवेश फार्म भरणे आवश्यक.
२. प्रवेश फार्म सोबत १०००/(एक हजार) रुपये डिपॉझिट देणे आवश्यक.
३. लिलाव प्रक्रिया क्रमवार पद्धतीने होईल.
४. लिलावाची अंतिम सर्व रक्कम संबंधितांनी त्याच दिवशी शासकीय खात्यावर भरणे आवश्यक.
५. त्रिनाव स्वीकारल्यानंतर त्याच दिवशी संपूर्ण साहित्य मूळ जागेवरून हलविणे आवश्यक.
६. लिलाव स्वीकारल्यानंतर पुढील शर्तीसंबंधीचे एफिडेविट रुपये १०० / चे स्टॅम्पवर करून देणे बंधनकारक राहील.
७. नियोजित वेळेपर्यंत लिलावाची रक्कम शासकीय खात्यावर न भरल्यास पुढील लिलावधारकास वाटचाल देण्यात येईल.
८. साहित्य निर्लेखन वेळची सुरक्षिततेची जबाबदारी संबंधितांची राहील.
९. लिलाव स्वीकारल्यानंतर साहित्याची जबाबदारी संबंधितांची राहील.
१०. त्रिनावाची बोली ज्याचे नावे जास्तीत जास्त होईल ती मंजुरी प्राप्त असेल.
११. लिलावाची किंमत शासकीय रुपयांपेक्षा कमी आल्यास लिलाव रद्द करण्याचा अधिकार शाळा व्यवस्थापन समिती मनू यांचा असेल.

**लिलाव -**
**बुधवार दि १२/०८/२०२६**
**सकाळी ठीक १०.००**
**स्थळ -** जि.प.प्राथमिक शाळा, मनू ता. कराड

**स्वाक्षरीत/-**
**मुख्याध्यापक**

**स्वाक्षरीत/-**
**अध्यक्ष**
शा.व्य.समिती मनू

# अनैतिक धंद्यामुळे सामाजिक वातावरण विषारी

**(रघुनाथ थोरात)**

समाजाचा पाया हा नैतिकता, कायद्याचा आदर आणि परस्पर विश्वास यांवर उभा असतो. परंतु आज अनेक ठिकाणी अनैतिक व बेकायदेशीर धंद्यांनी या पायालाच तडे जाऊ लागले आहेत. झटपट पैसा कमावण्याच्या हव्यासापोटी काही व्यक्ती समाजहित, संस्कार आणि कायदा यांना पायदळी तुडवत आहेत. परिणामी अनेक गावांमध्ये, शहरांमध्ये आणि लोकवस्त्यांमध्ये अस्वस्थता, भीती आणि संशयाचे वातावरण निर्माण होत आहे.

काही वर्षांपूर्वी गाव म्हणजे एक मोठे कुटुंब मानले जायचे. प्रत्येक घर एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी व्हायचे. आज मात्र अनेक ठिकाणी परिस्थिती बदलत आहे. संशयास्पद हालचाली, बेकायदेशीर व्यवहार आणि समाजस्वास्थ्याला बाधा आणणारे प्रकार उघडपणे सुरू असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. ही केवळ कायदा-सुव्यवस्थेची समस्या नसून समाजाच्या चारित्र्यालाच लागलेली कीड आहे.अनैतिक धंद्यांचा सर्वात मोठा फटका तरुण पिढीला बसतो. कष्ट न करता पैसा मिळतो, कायद्याची भीती राहत नाही आणि चुकीच्या मार्गानेही प्रतिष्ठा मिळू शकते, असा चुकीचा संदेश समाजात जातो. ही मानसिकता भविष्यात गुन्हेगारी वाढविण्यास



कारणीभूत ठरू शकते. त्यामुळे आजची उदासीनता उद्याचा मोठा सामाजिक धोका ठरू शकते.महिला, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिक यांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही या पार्श्वभूमीवर अधिक गंभीर बनतो. ज्या परिसरात कायद्याचा धाक कमी आणि अनैतिक कृत्यांचा प्रभाव जास्त असतो, त्या ठिकाणी सामान्य नागरिकांचे जगणे असुरक्षित होते. त्यामुळे विकासाच्या मोठमोठ्या घोषणा करून उपयोग नाही; समाजात सुरक्षितता आणि नैतिकता टिकवणे अधिक महत्त्वाचे आहे.या समस्येसाठी केवळ पोलीस प्रशासन जबाबदार आहे, असे म्हणणे योग्य ठरणार नाही. नागरिकांची निष्क्रियता, भीतीपोटी गप्प बसण्याची वृत्ती, राजकीय हस्तक्षेप, स्थानिक पातळीवरील मौन आणि काही वेळा स्वार्थी समर्थन यामुळे अशा प्रवृत्ती अधिक बळावतात. चुकीच्या गोष्टींकडे डोळेझाक करणे म्हणजे त्यांना मूक संमती देण्यासारखेच आहे.

आता वेळ आली आहे ती सामूहिक कृतीची. पोलीस आणि प्रशासनाने अशा धंद्यांवर कठोर आणि सातत्यपूर्ण कारवाई करावी. दोषींवर कोणताही दबाव किंवा पक्षपात न ठेवता कायद्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. ग्रामपंचायती, नगरपरिषदा, सामाजिक संस्था, युवक मंडळे, महिला बचतगट आणि सजग नागरिक यांनीही सामाजिक जबाबदारी स्वीकारून अशा प्रवृत्तींना विरोध केला पाहिजे.समाजाचे आरोग्य टिकवायचे असेल, तर केवळ रस्ते, इमारती आणि विकासकामे पुरेशी नाहीत. नैतिक मूल्ये, कायद्याचा सन्मान आणि सामाजिक जबाबदारी यांची जोपासना तितकीच आवश्यक आहे. अन्यथा विकासाच्या चमकदार आवरणाखाली समाज आतून पोखरला जाईल.

**अनैतिक धंद्यांविरोधातील लढा हा केवळ प्रशासनाचा नाही, तर प्रत्येक सजग नागरिकाचा आहे. आपल्या परिसरात कायद्याचे राज्य, सुरक्षित वातावरण आणि सुदृढ सामाजिक संस्कार टिकवण्यासाठी भीती न बाळगता योग्य ठिकाणी माहिती द्या, चुकीच्या प्रवृत्तींना सामाजिक पाठबळ देऊ नका आणि सत्याच्या बाजूने ठामपणे उभे राहा. कारण आज आपण गप्प राहिलो, तर उद्या विषारी वातावरणाची किंमत आपल्या पुढच्या पिढीला मोजावी लागू शकते.**

# संपूर्ण वंदे मातरम गीत गायन स्पर्धा उत्साहात




कराड : ज्ञानभारती कराड,जिजामाता स्मारक समिती,पुणे व शिक्षण मंडळ, कराड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संपूर्ण वंदे मातरम गीत गायन व पाठांतर स्पर्धा शिक्षण मंडळ,कराडमध्ये उत्साहात संपन्न झाली.स्पर्धेत कराड परिसरातील १५ शाळातील ३० समूहाने व २०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.सुरेल गायन,स्पष्ट उच्चार,शिस्तबद्ध सादरीकरण आणि पारंपारिक वेशभूषेत विविध संघानी संपूर्ण वंदे मातरम गीताचे सादरीकरण तथा पाठांतर केले.

प्रखर राष्ट्रभक्तीची प्रेरणा दृढ करणे, विद्यार्थ्यांच्या मनात वंदे मातरम गीताचा आदर व अभिमान निर्माण करणे,भारतीय संस्कृती व राष्ट्रनिष्ठेची संस्कार रुजवण्यासाठी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.वंदे मातरम गीत भारताच्या संपूर्ण स्वातंत्र्यासाठी प्रेरणादायी आहे,विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्र प्रेमाची भावना जागृत करण्यासाठी कवी बंकिमचंद्र बॅनर्जी यांच्या उत्कट भाववस्थेतून स्फुरलेले गीत भारतीय स्वातंत्र्याचा महामंत्र आहे असे प्रतिपादन राष्ट्रसेविका समितीच्या पश्चिम महाराष्ट्र बौद्धिक प्रमुख व पारितोषिक वितरण समारंभाच्या प्रमुख अतिथी मैत्रीयी शिरोळकर यांनी प्रसंगी केले. वंदे मातरम केवळ गीत नसून राष्ट्रभक्ती जागवणारा मंत्र आहे व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक सहशालेय उपक्रम आहे असे प्रतिपादन अध्यक्षीय मार्गदर्शनात शिक्षण मंडळ,कराडचे सचिव चंद्रशेखर देशपांडे यांनी केले.प्रमुख अतिथींच्या हस्ते यशस्वी संघांना पारितोषिके वितरित करण्यात आली.प्रसंगी परीक्षक आलापिनी जोशी,गायत्री कुलकर्णी,शुभदा पटवर्धन व प्रायोजक कांचन विंगकर व योगेश कदम यांचा सत्कार करण्यात आला.

सूत्रसंचालन सुवर्णा देशपांडे व डॉ.सुचेता हुद्देदार यांनी केले.उपक्रम यशस्वी करण्यासाठी ज्ञानभारती,कराड शाखेच्या कार्यकर्त्या मंजिरी सबनीस, सुषमा काळे,डॉ.सुचेता हुद्देदार,सुवर्णा देशपांडे,सुखदा विदार,अनघा बर्डे, माधुरी साने, स्वाती भागवत,राजश्री शेंडे,आरती कुलकर्णी,डॉ. नेहा वाचासुंदर,प्रबोधिनी किरपेकर,नम्रता कंठक व पुनम वास्के यांनी विशेष परिश्रम घेतले.

**स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे**

**लहान गट**

प्रथम-जनकल्याण प्रतिष्ठान संचालित सरस्वती विद्यामंदिर

द्वितीय-शिक्षण मंडळ,कराड संचालित इंग्रजी माध्यमाची शाळा

तृतीय-पोदार इंटरनॅशनल स्कूल

**मध्यम गट**

प्रथम -जनकल्याण प्रतिष्ठान संचालित सरस्वती विद्यामंदिर

द्वितीय-शेठ रामबिलास किसनलाल लाहोटी कन्या प्रशाला,कराड

तृतीय-शिक्षण मंडळ,कराड संचालित इंग्रजी माध्यमाची शाळा

**मोठा गट**

प्रथम-जनकल्याण प्रतिष्ठान संचालित सरस्वती विद्यामंदिर

द्वितीय-शेठ रामबिलास किसन लाल लाहोटी कन्या प्रशाला,कराड


तृतीय-टिळक हायस्कूल,कराड

# बिबट्याच्या दहशतीने स्थानिक भूमिपुत्र अडचणीत

बामणोली : महाबळेश्वर तालुक्यातील दुर्गम भागात व परिसरामध्ये सध्या माणसांपेक्षा बिबट्याच्या दहशतीने स्थानिक भूमिपुत्रांना रात्रीच्या अंधारापूर्वी घरात बंदिस्त व्हावे लागत आहे. जमिनीवर सरपटणारे विषारी नागापेक्षाही या भागात बिबट्याच्या दहशतीने स्थानिक भूमिपुत्र अडचणीत आले आहेत. याबाबत वन विभागाने दुर्घटना घडल्यानंतरच येण्याअगोदर माणुसकी म्हणून तरी पहावे. अशी मागणी झांजवड येथील सामाजिक कार्यकर्ते अनंत जाधव व परिसरातील भूमिपुत्रांनी केली आहे.

मानवी वस्तीच्या उंबरठ्यापर्यंत बिबट्याचे आगमन झाल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना शेतीची कामे करताना भात लागणा कडे लक्ष द्यावे की बिबट्याकडे? असा प्रश्न पडला आहे. शाळेतून ये जा करणाऱ्या मुलांसाठी एखादं रस्त्यात कुत्रे आडव्या आले तरी बिबट्या आले असे समजून त्यांच्या छातीची धडधड वाढत आहे.

गेल्या काही दिवसांपासून जावळी व महाबळेश्वर तालुक्यातील दुर्गम भागात असलेल्या परिसरात बिबट्याने शिकारीसाठी पाळीव प्राण्यांवर सुद्धा हल्ले केले आहेत. परिसरातील अनेक कोंबड्या बकऱ्या , कुत्री , पाळीव जनावरे यांच्यावर हल्ला करून काहींना जखमी तर काहींचा जीव घेतला आहे. वाढलेल्या झाडे झुडपामध्ये लपून बसून बिबट्या अंदाज घेत आहेत. यामुळे शेतकरी, शेतमजूर भात लागण साठी सुद्धा शेतात



जाण्याकरिता घाबरत आहेत. बिबट्याचा वावर असलेल्या ठिकाणी तात्काळ पिंजरे लावावेत व बिबट्याला जेरबंद करावे. रात्रीची विशेष गस्त सुरू करावी.ड्रोनच्या साहाय्याने बिबट्याचे अचूक लोकेशन शोधावे व सौरऊर्जेवरील विद्युत खांबावर दिव्यांची सोय वस्ती व शेतातील रस्त्यांवर करावी.बिबट्याच्या हल्ल्यात मारल्या गेलेल्या पाळीव प्राण्यांची किंवा जखमी नागरिकांची आर्थिक भरपाई शासनाने त्वरित द्यावी.

# यू बिझनेस मिटतर्फे इंडो-थाई बिझनेस कॉरिडोरचे उद्घाटन

## भारत-थायलंड व्यावसायिक सहकार्यास चालना

रायगड : यू बिझनेस मिटतर्फे बेलापूर येथील बीआरएससीसीएलमध्ये इंडो-थाई बिझनेस कॉरिडोरचे उद्घाटन करण्यात आले. भारत आणि थायलंडमधील उद्योग-व्यवसायाला चालना देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला असून, यापूर्वी आयोजित नवी मुंबई ग्लोबल समिटनंतरचे हे पुढचे पाऊल असल्याचे आयोजकांनी सांगितले. यू बिझनेस मिटचे संस्थापक वैभव सोनटक्के यांनी सहकारी समृद्धी वाणी, पत्रकार विवेक पाटील, पत्रकार मंदार दोंदे आणि संलग्न संस्थांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत या उपक्रमाची घोषणा केली.



एक्सपोर्ट-इम्पोर्ट, वैद्यकीय पर्यटन, रिअल इस्टेट, माध्यम, मनोरंजन, उत्पादन उद्योग, कृत्रिम बुद्धिमत्ता, माहिती तंत्रज्ञान, बँकिंग, वित्त आणि बांधकाम क्षेत्रातील उद्योजकांना थायलंडमधील व्यावसायिक संधी उपलब्ध करून देण्याचा या कॉरिडोरचा उद्देश असल्याचे सोनटक्के यांनी सांगितले. याचवेळी यू बिझनेस मिटतर्फे कॉर्पोरेट बिझनेस सेंटरचेही उद्घाटन करण्यात आले. उद्योजकांना अल्प शुल्कात कार्यालयीन सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच आंतरराष्ट्रीय व्यवसायासाठी आवश्यक कायदेशीर मार्गदर्शन, सरकारी परवाने आणि व्यावसायिक करारांसंदर्भात सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे.उद्घाटन सोहळ्यास डॉ. राहुल भातांबरे, डॉ. प्रियांका आशिष, अमृत नेरळीकर, डॉ. मनीष राय, केतकी पटवर्धन, जान्हवी पाटील तसेच विविध क्षेत्रांतील प्रतिनिधी उपस्थित होते. थायलंडमधील पिटाचे मुख्य संचालक तथा थायलंड दूतावासाचे सल्लागार प्रसर्त पियासाचादेश यांनी ऑनलाइन सहभाग घेत भारत-थायलंड व्यावसायिक सहकार्य वाढविण्याच्या उपक्रमाचे स्वागत केले. दैनिक महासागरचे संपादक श्रीकृष्ण चांडक व महाव्यवस्थापक दत्ता कुलकर्णी यांचीही उपस्थिती होती. यावेळी वैभव सोनटक्के यांनी क्रॉस बॉर्डर बिझनेस ऑपॉर्च्युनिटी या विषयावर मार्गदर्शन केले.

**समृद्धी वाणी यांनी या उपक्रमाला उद्योजकांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे सांगितले. पत्रकार मंदार दोंदे व विवेक पाटील यांच्या समन्वयातून पुढील आठवड्यात 'ग्लोबल जर्नलिझम' या विषयावर थायलंडमधील शिष्टमंडळासोबत ऑनलाइन बैठकीचे आयोजन करण्यात येणार आहे.**

# ओबीसी सवलती हव्यात, पण आंदोलन व अधिवेशनात सहभाग नको;समाजात आत्मचिंतनाची गरज

**(अजित जगताप)**

सातारा : ओबीसी समाजाला मिळणाऱ्या आरक्षण व विविध सवलतींसाठी हक्काने मागणी केली जाते; मात्र त्या हक्कांसाठी होणाऱ्या आंदोलन, मोर्चे आणि अधिवेशनांमध्ये अपेक्षित सहभाग दिसून येत नाही. त्यामुळे ओबीसी समाजाने आपल्या हक्कांसाठी संघटित होऊन सक्रिय भूमिका घेण्याची गरज असल्याची भावना पुरोगामी चळवळीतील कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे.



७ ऑगस्ट रोजी माजी पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांनी मंडल आयोगाची अंमलबजावणी करून इतर मागासवर्गीय समाजाला आरक्षणाचा अधिकार मिळवून दिला. त्यानंतर ओबीसी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय हक्कांसाठी विविध स्तरांवर लढे सुरू आहेत. मात्र सवलतींचा लाभ घेणारे अनेकजण समाजाच्या प्रश्नांवरील आंदोलनांपासून दूर राहतात, अशी चर्चा आता सुरू झाली आहे.

राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे ११ वे महाअधिवेशन गुरुवार, दि. ७ ऑगस्ट २०२६ रोजी बंगळुरू येथील ज्ञानज्योती ऑडिटोरियम, सेंट जोसेफ युनिव्हर्सिटी येथे होणार आहे. या अधिवेशनात आरक्षण, सामाजिक न्याय, शैक्षणिक व राजकीय प्रतिनिधित्व यांसह विविध प्रश्नांवर चर्चा होणार आहे. देशभरातील ओबीसी नेते, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्ते यात सहभागी होणार आहेत.

महाराष्ट्रात ओबीसी समाजाची लोकसंख्या अंदाजे ३८ टक्क्यांच्या आसपास असल्याचे सांगितले जाते. राज्यातील ओबीसी प्रवर्गात ३४६ पेक्षा अधिक जातींचा समावेश असून १९ टक्के आरक्षणाची तरतूद आहे. सातारा जिल्ह्यातही ओबीसी समाजाची मोठी संख्या असून कुणबी नोंदी मोठ्या प्रमाणावर आढळल्या आहेत. ओबीसी समाजाच्या हक्कांसाठी केवळ सवलतींचा लाभ घेणे पुरेसे नसून त्यासाठी होणाऱ्या लोकशाही मार्गावरील लढ्यात सहभागी होणे आवश्यक असल्याचे मत कार्यकर्त्यांनी व्यक्त केले. अमोल गंगावणे, ऋषिकेश गायकवाड, गणेश भिसे, गणेश वाघमारे, अरुण पवार, गुलाब बनसोडे, राजेंद्र ओव्हाळ, दत्ता केंगार, पूजा बनसोडे व अक्षय कांबळे यांनी ओबीसी समाजात जनजागृतीची गरज असल्याचे सांगितले. आरक्षण टिकवण्यासाठी समाजाने संघटित होऊन आपली भूमिका स्पष्ट करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

दैनिक कृष्णा एक्सप्रेस हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक आणि मालक गोरख काशिनाथ तावरे यांनी माऊली ऑफसेट प्रेस, गट क्रमांक ३२४/३, बैल बाजार रोड, मलकापूर - कराड, ता. कराड, जि. सातारा पिन कोड ४१५५३९ येथे छापून, ३७५, गाळा नंबर ४ शनिवार पेठ, कराड ता. कराड जि. सातारा - ४१५११० येथून प्रकाशित केले. ※ संपादक - गोरख काशिनाथ तावरे

DAILY KRISHNA EXPRESS Printer, Published and Owner by Gorakh Kashinath Taware Pritnted at Mauli Offset Press, Gat No.324/3, Bail Bajar Road, Malkapur-Karad, Tal- Karad, Dist- Satara Pin-415539, and Published at 375, Shop No.4, Shaniwar Peth, Karad, Tal- Karad, Dist.- Satara 415 110. Editor - Gorakh Kashinath Taware

# मैत्रीचा उत्सव... गडाच्या हिरवाईसाठी

## १३० ते १७५ किलो वजनाची दुर्मीळ वृक्षे रोप-वेने सदाशिवगडावर ५५ हजारांहून अधिक खर्चातून पर्यावरण संवर्धनाचा आदर्श

कराड : फ्रेंडशिप डे आणि टिळक हायस्कूलच्या वर्धापनदिनाचे औचित्य साधत मैत्रीचा उत्सव केवळ आठवणींमध्ये न साजरा करता तो समाजोपयोगी कार्यात रूपांतरित करण्याचा प्रेरणादायी आदर्श कराडातील टिळक हायस्कूलच्या १९९२ च्या दहावी (ड) तुकडीतील माजी विद्यार्थ्यांनी घालून दिला. सदाशिव परिवार दुर्ग, सदाशिवगड यांच्या सहकार्याने गडावर दहा दुर्मीळ वृक्षांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा अनोखा संदेश देण्यात आला.

या उपक्रमासाठी महेश पाटील मित्र परिवाराने पुढाकार घेतला. यात शशिकांत पाटील, प्रकाश वत्रे, हणमंत कुंभार, अमोल जगदाळे, अभिजीत वेदपाठक, सुजीत थोरात, इंजोजी शेडगे, फरी खतीब, अल्ताफ भालदार या सर्व वर्गमित्रांच्या पुढाकारातून तसेच मनोज डुबल यांनी रोप वे उपलब्ध करून दिला तसेच झाडे लावण्यास प्रत्यक्ष विशेष मदत आबा लोकरे, नरेंद्र मुळीक, सुरज पुजारी, मोरे व प्रशांत भोसले रोप वे चालक या सर्वांच्या सहकार्यामुळे संपूर्ण नियोजन यशस्वी झाले. विशेष



म्हणजे ही वृक्षे तामिळनाडूतील राजकुंद्री येथून आणण्यात आली. प्रत्येकी १३० ते १७५ किलो वजनाची ही मोठी वृक्षे दुर्गम सदाशिवगडावर पोहोचविणे हे मोठे आव्हान होते. मात्र रोप-वेच्या साहाय्याने ही सर्व वृक्षे सुरक्षितपणे गडावर नेण्यात आली.

वृक्षांची वाढ उत्तम व्हावी यासाठी केवळ लागवड करून न थांबता प्रत्येक झाडासाठी तीन फूट बाय तीन फूट आकाराचे दहा खड्डे तयार करण्यात आले. या खड्ड्यांमध्ये भरण्यासाठी १५० पोती गाळयुक्त सुपीक माती रोप-वेने गडावर चढविण्यात आली. त्याचबरोबर १५० किलो ह्यूमस खत आणि शेणखत वापरून झाडांना आवश्यक पोषण देण्यात आले. झाडांच्या संरक्षणासाठी लोखंडी रॉड आणि शेडनेटचीही व्यवस्था करण्यात आली.

आजच्या काळात फ्रेंडशिप डे हा केवळ शुभेच्छा, भेटवस्तू किंवा सोशल मीडियापुरता मर्यादित राहत असताना या माजी विद्यार्थ्यांनी मैत्रीचे नाते समाजासाठी आणि निसर्गासाठी जपण्याचा वेगळा संदेश दिला. वर्षानुवर्षे टिकून असलेल्या मैत्रीने आता सदाशिवगडाच्या हिरवाईत नवे जीवन फुलविण्याचा संकल्प केला आहे. त्यामुळे या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, पर्यावरण संवर्धनासाठी इतर मित्रपरिवारांनाही तो प्रेरणा देणारा ठरत आहे.

### मैत्रीची आठवण... हिरवाईची देणगीही..

**शाळेतील मैत्री अनेकदा आठवणींतच राहते; मात्र मैत्रीला समाजोपयोगी दिशा दिली. दुर्गम गडावर शेकडो किलो वजनाची वृक्षे चढविणे, शेकडो पोती माती नेणे आणि स्वत:च्या खर्चातून पर्यावरण संवर्धनाचा संकल्प पूर्ण करणे, ही केवळ वृक्षलागवड नाही; तर मैत्रीचा वारसा पुढच्या पिढ्यांसाठी हिरवागार करण्याचा प्रयत्न आहे. त्यामुळे हा उपक्रम फ्रेंडशिप डेचा खऱ्या अर्थाने आदर्श ठरला आहे.**

# कराडच्या संजीवन मेडिकल सेंटरचा पश्चिम महाराष्ट्रात नवा विक्रम

## एकाच दिवशी दोन TAVI प्रक्रिया यशस्वी



कराड : पश्चिम महाराष्ट्रातील हृदयरोग उपचार क्षेत्रात कराडच्या संजीवन मेडिकल सेंटरने आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. सातारा जिल्ह्यात २०२३ मध्ये पहिली TAVI (ट्रान्सकॅथेटर एऑर्टिक व्हॉल्व्ह इम्प्लांटेशन) प्रक्रिया करणाऱ्या संजीवन मेडिकल सेंटरने आतापर्यंत आठ TAVI प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर आता एकाच दिवशी दोन हृदयरुग्णांवर TAVI प्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडली आहे. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रात अशी कामगिरी करणारे हे पहिले रुग्णालय ठरल्याचा दावा रुग्णालय प्रशासनाने केला आहे.

इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट डॉ. विजयसिंह राजाराम पाटील यांच्या नेतृत्वाखालील हृदयरोग तज्ज्ञांच्या पथकाने अत्याधुनिक कॅथलॅबमध्ये आधुनिक इमेजिंग तंत्रज्ञानाच्या साहाय्याने दोन्ही प्रक्रिया पूर्ण केल्या. प्रक्रियेनंतर दोन्ही रुग्णांची प्रकृती स्थिर असून उपचारांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. एका रुग्णाला चौथ्या दिवशी घरी सोडण्यात आल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली.

TAVI ही गंभीर एऑर्टिक व्हॉल्व्ह स्टेनोसिस असलेल्या रुग्णांसाठी प्रभावी उपचारपद्धती मानली जाते. या प्रक्रियेत छाती न उघडता मांडीतील रक्तवाहिनीद्वारे विशेष कॅथेटरच्या साहाय्याने नवीन जैविक एऑर्टिक व्हॉल्व्ह हृदयात बसविण्यात येतो. त्यामुळे मोठ्या शस्त्रक्रियेची गरज राहत नाही, रक्तस्राव कमी होतो, रुग्ण लवकर बरा होतो आणि रुग्णालयातील मुक्कामही कमी होतो. ज्येष्ठ नागरिक आणि ओपन हार्ट शस्त्रक्रियेचा धोका असलेल्या रुग्णांसाठी ही उपचारपद्धती उपयुक्त ठरते.

या प्रक्रियेत कार्डियाक नेस्थेशिया तज्ज्ञ डॉ. सुहास पाटील, इकोकार्डिओग्राफी तज्ज्ञ डॉ. पुनम बागल, कॅथलॅब टीममधील अमित चोपडे, धनश्री पाटील, जगदीश तसेच अतिदक्षता विभागातील डॉ. तृप्ती फरांदे, स्वप्नील साळुंखे आणि अन्य वैद्यकीय कर्मचाऱ्यांचे योगदान लाभले. डॉ. विजयसिंह पाटील यांनी ग्रामीण व निमशहरी भागातील रुग्णांना अत्याधुनिक हृदयरोग उपचार स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देणे हे संस्थेचे ध्येय असल्याचे सांगितले. चेअरमन डॉ. राजाराम पाटील यांनी या यशाबद्दल वैद्यकीय पथकाचे अभिनंदन करत, आधुनिक तंत्रज्ञान आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या बळावर दर्जेदार आरोग्यसेवा देण्याचा संकल्प कायम असल्याचे नमूद केले.

# 'राजा चिकन सेंटर'ची अन्न औषध प्रशासनाकडे तक्रार;तातडीच्या तपासणीची मागणी

कराड : मलकापूर येथील 'राजा चिकन सेंटर' या चिकन विक्री आस्थापनामध्ये अन्न सुरक्षा व सार्वजनिक आरोग्य नियमांचे संभाव्य उल्लंघन होत असल्याचा आरोप करत प्रभू सुनील जाधव व परिसरातील नागरिकांनी अन्न व औषध प्रशासनाकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी तक्रारीत करण्यात आली आहे. तक्रारीनुसार, संबंधित आस्थापनामध्ये विक्रीस ठेवण्यात




येणाऱ्या चिकनची गुणवत्ता, स्वच्छता, साठवणूक पद्धती तसेच अन्न सुरक्षा नियमांच्या पालनाबाबत गंभीर शंका निर्माण झाल्या आहेत. दुर्गंधीयुक्त व मानवी आरोग्यास अपायकारक ठरू शकणारे चिकन विक्रीस ठेवले जात असल्याचा आरोप करण्यात आला असून, त्यामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

याशिवाय आस्थापनाच्या परिसरात अस्वच्छता, दुर्गंधी आणि कचऱ्याचे अयोग्य व्यवस्थापन असल्यामुळे सार्वजनिक आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या संदर्भातील छायाचित्रे तसेच इतर पुरावे उपलब्ध असल्याचा दावाही तक्रारदारांनी केला आहे. परिसरातील नागरिकांनी याबाबत वेळोवेळी नाराजी व्यक्त केल्याचेही तक्रारीत म्हटले आहे.

अन्न व औषध प्रशासनाने संबंधित आस्थापनाची तातडीने पाहणी करून अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ आणि त्याअंतर्गत लागू नियमांचे पालन होत आहे की नाही, याची तपासणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच विक्रीसाठी ठेवलेल्या चिकनचे नमुने घेऊन मान्यताप्राप्त प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविणे, आवश्यक परवाने व नोंदणीची पडताळणी करणे, अन्न साठवणूक, स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनाची तपासणी करणे, तसेच कोणतेही उल्लंघन आढळल्यास संबंधितांवर लागू कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे. दरम्यान, नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, अशी अपेक्षा तक्रारदार प्रभू सुनील जाधव आणि परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# मोफत आयुष निदान व उपचार शिबिर संपन्न

सातारा : आजच्या युगात शारिरीक व्याधीपेक्षा मानसिक व्याधी ग्रामीण भागापेक्षा शहरी भागांमध्ये जास्त आढळुन येतात. त्या करिता शारिरिक आणि मानसिक स्वास्थ्य टिकवण्यासाठी आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी आणि योग यांचा समावेश दैनंदिन जीवनामध्ये प्रत्येकाने केला तर माणसाला निरोगी आयुष्य जगणे सहज सोपे असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा डॉ. प्रियाताई शिंदे यांनी केले. उद्घन प्रसंगी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. राहुल जाधव, अति. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अतुल लिपारे, डॉ. उल्का झेंडे, डॉ. अरुंधती कदम, डॉ. चंद्रकांत काटकर, डॉ. समिर टकले, डॉ. लाहोटी, जिल्हा आयुष अधिकारी डॉ. मिथुन पवार, सहाय्यक जिल्हा आयुष अधिकारी डॉ. संजीवनी शिंदे, श्रीमती कालसेकर उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. प्रियाताई शिंदे म्हणाल्या, प्राचीन काळापासुन आयुर्वेद आणि होमिओपॅथी या दोन्ही




औषधोपचाराला अधिक प्राधान्य दिले जात होते. खरे पाहता आयुर्वेद हा प्रत्येकाच्या अवतीभोवती प्रत्येकांच्या स्वयपांकघरात असुन त्यांचा योग्य उपयोग झाल्यास शरीरस्वास्थासाठी निश्चितच फायदेशीर ठरतो. जनजागृती झाल्याने दिवसेंदिवस आयुर्वेदीक आणि होमिओपॅथी औषधउपचाराकडे सर्वसामान्य माणसांचा कल वाढला असुन एक खात्रीशीर औषधोपचार म्हणुन पाहिले जात आहे या औषधउपचाराच्या जनजागृतीसाठी दर तीन महिन्याने एकदा अशा शिबीराचे आयोजन केले जावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केल्या.

यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. जाधव म्हणाले, जिल्हा रुग्णालयात सातारा येथे गेली १७ वर्षे आयुष विभागअंत्यत चांगल्या प्रकारे काम करत आहे.

जिल्हा रुग्णालयातील इतर विभागांमधून आयुष विभागात विविध रुग्ण संदर्भित करण्यात येतात व त्या सर्व रुग्णांवर आयुष विभागामध्ये अत्यंत चांगल्या प्रकारे निदान व उपचार केले जातात असे गौरवोद्गार त्यांनी काढले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. मिथुन पवार जिल्हा आयुष अधिकारी, डॉ. संजीवनी शिंदे सहा. जिल्हा आयुष अधिकारी यांनी सुत्रसंचालन व आभार मानले. शिबीराच्या यशस्वीते साठी डॉ. अभिजित भोसले, डॉ. किर्ती कुमार घेवारी, डॉ. आफशा खान, योग तज्ञ पुरब आनंदे, प्रियांका जाधव, प्रिती तपासे, जया कदम, पृथ्वीराज गायकवाड, निलम साळुंखे यांनी विशेष प्रयत्न केले.

# गॅस सिलिंडरवर अतिरिक्त कर!

नवी दिल्ली : इराण आणि अमेरिका यांच्यातील युद्धामुळे जागतिक इंधन पुरवठा साखळीवर परिणाम झाला आहे. याचा फटका भारतासह अनेक देशांना बसला. अशातच आता आगामी काळात भारतातील एलपीजी सिलिंडरच्या किमतीत वाढ होण्याची शक्यता आहे. एका आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्थेच्या अहवालानुसार केंद्र सरकार जवळपास ३.९९ लाख कोटी रुपये उभारण्याच्या योजनेवर विचार करत आहे. यासाठी एलपीजी आणि नैसर्गिक वायू वापरणा-या ग्राहकांकडून अतिरिक्त शुल्क आकारण्याचा प्रस्ताव विचाराधीन असल्याचे समोर आले आहे.

# तीन बालकामगारांची सुटका, मालकावर गुन्हा दाखल

सातारा : जुनी एमआयडीसी, सातारा कंपनीवरील आस्थापनावर सहायक कामगार आयुक्त कार्यालयाने धाड टाकून ३ बालकामगारांची सुटका केली आहे. याप्रकरणी कारखान्याचे मालकाविरुद्ध सातारा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिनांक ३ ऑगस्ट २०२६ रोजी कामगार अधिकारी आणि दुकाने निरीक्षकांच्या पथकाने बी-४३, जुनी एमआयडीसी येथील आस्थापनाची तपासणी करण्यात आली. यावेळी उत्तर प्रदेश येथील रहिवासी तीन किशोरवयीन कामगार कपाटाचे भाग उचलून ठेवणे, कटिंग करणे आणि तयार झालेल्या कपाटांना पेंटिंग करणे अशी कामे करताना आढळून आले.

सदर आस्थापना ही धोकादायक प्रक्रियेच्या व्याख्येत येत असल्याने, बाल व किशोरवयीन कामगार (प्रतिबंध व विनियमन) अधिनियमांतर्गत ही कारवाई करण्यात आली. ही धडक कारवाई सरकारी कामगार अधिकारी श्रीमती अ. प्र. वालावलकर, श्रेणी-२ चे दुकाने निरीक्षक श्री. ह. कि. धापटे, श्री. घ. व. जाधव आणि श्री. अ. इ. पटेल यांच्या संयुक्त पथकाने केली. बाल व किशोरवयीन कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम, १९८६ अन्वये १४ वर्षांखालील बालकांना कोणत्याही धोकादायक किंवा बिगरधोकादायक व्यवसायात काम करण्यास सक्त मनाई आहे. तसेच १४ ते १८ वर्षे वयोगटातील किशोरवयीन मुलांना कोणत्याही धोकादायक प्रक्रियेत कामावर ठेवणे हा गंभीर व शिक्षेस पात्र गुन्हा आहे. सातारा जिल्ह्यातील सर्व दुकाने, आस्थापना, कारखाने, वीटभट्ट्या, चित्रपटगृहे, गॅरेज व इतर उद्योगांनी बाल व किशोरवयीन कामगारांना कामावर ठेवू नये, अन्यथा संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे सहायक कामगार आयुक्त नि.कृ. कवले यांनी कळविले आहे.

# राष्ट्रीय लोकअदालत १२ सप्टेंबर रोजी आयोजन

सातारा : राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सातारा यांच्या मार्फत जिल्हा व सत्र न्यायालय, सातारा तसेच सर्व तालुका न्यायालयात शनिवार दि. १२ सप्टेंबर २०२६ रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्हयातील सर्व न्यायालयांतील तडजोडपात्र स्वरुपाची दिवाणी व फौजदारी प्रलंबित प्रकरणे तसेच दाखलपूर्व प्रकरणे तडजोडीसाठी राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये ठेवण्यात येणार आहेत. तडजोड होवू शकणारी प्रकरणे व दाखलपूर्व प्रकरणे तडजोडीसाठी १२ सप्टेंबर २०२६ रोजी राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये ठेवावयाची असल्यास संबंधित न्यायालयात जावून प्रकरण तडजोडीसाठी ठेवावयाचे आहे असे संबंधित अधिक्षक अथवा लिपिक तसेच संबंधित वकिलांना कळवावे. लोक अदालतीत तडजोड झाल्याने कायमस्वरुपी वाद मिटू शकेल, क्षुल्लक वादाचे पर्यावसन कायमस्वरुपी वादात होणार नाही. हाच लोक अदालतीचा हेतू आहे. शिवाय लोक अदालतीतील निकालाविरुध्द अपील होत नाही, वेळ व पैशाची बचत होते. लोक अदालतीमध्ये दिवाणी, तडजोडपात्र स्वरुपाची फौजदारी कौटुंबिक वाद, मोटार अपघात भरपाई प्रकरणे, भूसंपादन प्रकरणे ठेवावयाची असल्यास संबंधित वकिलांना कल्पना द्यावी किंवा अधिक माहितीसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सातारा किंवा तालुका विधी सेवा समिती येथे संपर्क साधावा, असे आवाहन मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अरविंद वाघमारे यांनी केले आहे.

# प्रेमलाताई चव्हाण तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांची गुणवत्तेची भरारी

## पीआयसीटी, व्हीआयटीसह नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयांत थेट द्वितीय वर्षासाठी प्रवेश; गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

कराड (प्रतिनिधी): अभियांत्रिकी शिक्षणातील गुणवत्तापूर्ण वाटचालीची परंपरा कायम राखत यशवंत विद्यापीठ, कराड संचलित श्रीमती प्रेमलाताई चव्हाण तंत्रनिकेतनच्या कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. डिप्लोमा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या सीईटी सेलमार्फत सुरू असलेल्या डिग्री अभियांत्रिकीच्या थेट द्वितीय वर्ष प्रवेश प्रक्रियेतील पहिल्या फेरीत अनेक विद्यार्थ्यांना पश्चिम महाराष्ट्रातील नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयांत प्रवेश मिळाला आहे.

सन २०२५-२६ मध्ये तंत्रनिकेतनच्या कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी उन्हाळी परीक्षा २०२६ मध्ये उत्तम गुण मिळवत आपली गुणवत्ता सिद्ध केली होती. त्याच गुणवत्तेच्या जोरावर पुढील उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांनी



नामांकित महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळविला आहे.यामध्ये कुमारी आर्या राजेश थोरात हिला पुणे येथील PICT, तर प्राजक्ता अनिल मोहिते आणि संचिता शेवाळे यांना VIT, पुणे येथे प्रवेश मिळाला आहे. तसेच विभागातील इतर विद्यार्थ्यांनाही त्यांच्या गुणवत्तेनुसार आणि पसंतीनुसार विविध नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये पुढील शिक्षणाची संधी प्राप्त झाली आहे.

या यशाबद्दल तंत्रनिकेतनच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्राचार्य एस. एस. किणीकर म्हणाले, तंत्रनिकेतनमध्ये महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाचे नियोजनबद्ध अध्यापन, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि शैक्षणिक प्रगतीवर विशेष लक्ष दिले जाते. विद्यार्थ्यांना मिळत असलेले हे यश म्हणजे या प्रयत्नांची पोचपावती असून, भविष्यातही विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी संस्था प्रयत्नशील राहील.

# रक्तदान, नेत्रतपासणीसह अनाथ मुलांना मदतीचा हात

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त जी.के.गुजर ट्रस्टचे सामाजिक उपक्रम

कराड (प्रतिनिधी): वाढदिवसाचा उत्सव सामाजिक बांधिलकीच्या उपक्रमांतून साजरा करण्याच्या उद्देशाने जी. के. गुजर मेमोरियल चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने आमदार प्रशांत रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. आरोग्यसेवा, रक्तदान आणि गरजू घटकांना मदतीचा हात देत ट्रस्टने सामाजिक उत्तरदायित्वाची जपणूक केली.

जी. के. गुजर मेमोरियल चॅरिटेबल ट्रस्टअंतर्गत डॉ. दौलतराव आहेर कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग व डॉ. अशोक गुजर इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने




हे उपक्रम आयोजित करण्यात आले. महाविद्यालय परिसरात आयोजित रक्तदान शिबिराला विद्यार्थ्यांसह प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या शिबिरात शंभरहून अधिक जणांनी स्वेच्छेने रक्तदान केले. रक्तदानाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. धोंडेवाडी (ता. कराड) येथे आयोजित मोफत नेत्रतपासणी शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांनी नागरिकांची तपासणी केली. तपासणीनंतर गरज असलेल्या लाभार्थ्यांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. तसेच नेत्रविकार आढळलेल्या गरजू रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करून देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

दरम्यान, सामाजिक संवेदनशीलतेचा परिचय देत ट्रस्टच्या वतीने कोळे येथील जिजाऊ आश्रमातील अनाथ मुलांना अन्नदान करण्यात आले. यावेळी मुलांना आवश्यक मदतही करण्यात आली. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी उमेश पोतदार, गजानन भिसे व निलेश पाटील यांनी उपस्थित राहून उपक्रमांचे कौतुक केले. यावेळी जी. के. गुजर मेमोरियल चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. अशोक गुजर, उपाध्यक्ष इंद्रजीत गुजर, सचिव डॉ. माधुरी गुजर, विश्वस्त वीरेंद्र गुजर यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# सहकारमहर्षी जयवंतराव भोसले यांच्या स्मृतींना अभिवादन

## आप्पासाहेबांच्या कार्याचा वारसा ग्रामीण विकासासाठी आजही प्रेरणादायी-भरत पाटील



कराड (प्रतिनिधी): सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण भागाच्या विकासाला नवी दिशा देणारे आणि कृष्णा उद्योग समूहाच्या उभारणीत मोलाची भूमिका बजावणारे सहकारमहर्षी स्व. जयवंतराव भोसले (आप्पासाहेब) यांच्या पुण्यतिथीनिमित्त कराड येथे त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी राष्ट्रीय खनिज विकास महामंडळ (भारत सरकार)चे स्वतंत्र संचालक भरत पाटील (नाना), कराडचे माजी नगरसेवक हनुमंतराव पवार, बापूसाहेब सावंत, आप्पा सावंत यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते. स्व. जयवंतराव भोसले यांनी सहकार, उद्योग, शेती, आरोग्य, शिक्षण आणि समाजकारण या विविध क्षेत्रांत भरीव योगदान देत ग्रामीण विकासाची व्यापक संकल्पना प्रत्यक्षात आणली. त्यांच्या नेतृत्वातून उभ्या राहिलेल्या विविध संस्था आणि उपक्रमांमुळे अनेकांना विकासाची संधी मिळाली.

आप्पासाहेबांनी जपलेली सहकाराची मूल्ये, सामाजिक बांधिलकी आणि सर्वसामान्यांच्या विकासाची भूमिका आजच्या पिढीसाठी दिशादर्शक आहे. त्यांच्या कार्याचा हा समृद्ध वारसा पुढे नेणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. उपस्थितांनी त्यांच्या स्मृतींना कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले.

# सायबर सुरक्षेसाठी कराडचे २० विद्यार्थी 'सायबर वॉरियर्स'

## शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' उपक्रमाचा प्रारंभ

कराड (प्रतिनिधी): वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर डिजिटल सुरक्षिततेबाबत जनजागृती करण्यासाठी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड येथे क्विक हिल फाउंडेशन आणि महाराष्ट्र सायबर यांच्या संयुक्त विद्यमाने 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' उपक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. या उपक्रमांतर्गत महाविद्यालयातील २० विद्यार्थ्यांची 'सायबर वॉरियर्स' म्हणून निवड करण्यात आली आहे.



'कमवा आणि शिका' संकल्पनेवर आधारित हे विद्यार्थी शाळा, महाविद्यालये तसेच समाजातील विविध घटकांमध्ये सायबर सुरक्षा, डिजिटल गोपनीयता, डेटा संरक्षण, सुरक्षित इंटरनेट वापर आणि ऑनलाइन फसवणुकीपासून बचाव याबाबत जनजागृती करणार आहेत. निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी पुणे येथील क्विक हिल फाउंडेशनच्या मुख्यालयात आयोजित 'सायबर सिम्पोजियम' प्रशिक्षण पूर्ण केले.

'माय डेटा, माय रिस्पॉन्सिबिलिटी' या संकल्पनेवर आधारित प्रशिक्षणात सायबर सुरक्षेतील नवीन आव्हाने, डिजिटल गोपनीयता, डेटा संरक्षण आणि सायबर गुन्ह्यांपासून बचावाच्या उपायांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.


क्लब स्थापनेच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना 'सायबर वॉरियर' पदचिन्हे प्रदान करण्यात आली. यावेळी क्लबच्या पदाधिकाऱ्यांचीही निवड झाली. अनिकेत देशमाने अध्यक्ष, आकांक्षा माने सचिव, साक्षी निगडे गतीविधी संचालक, तर तुषार खोचारे यांची मीडिया संचालक म्हणून निवड करण्यात आली. महाविद्यालयाने मागील वर्षीही हा उपक्रम यशस्वीपणे राबविला होता. त्याबद्दल क्विक हिल फाउंडेशनतर्फे महाविद्यालयाला 'सर्वोत्कृष्ट सायबर स्मार्ट क्लब', तर क्लब समन्वयकांना 'सर्वोत्कृष्ट शिक्षक समन्वयक' हा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता.

प्राचार्य डॉ. संजीव वाघ म्हणाले, सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेता विद्यार्थी आणि नागरिकांनी डिजिटल व्यवहारांमध्ये सजग राहणे ही काळाची गरज आहे. महाविद्यालयाच्या माध्यमातून समाजाच्या विविध स्तरांपर्यंत सायबर सुरक्षिततेचा संदेश पोहोचविला जाईल. यावेळी उपसंचालक डॉ. एस. के. पाटील, एमसीए विभागप्रमुख प्रा. भागवत पाटील, क्लब समन्वयक प्रा. डॉ. प्रियांका शिंदे, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. आळसुंदकर, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. उमेश देशपांडे आदी उपस्थित होते.

# शेतातील वीज पंपाचा धक्का लागून २२ वर्षीय युवकाचा मृत्यू

## विंग येथील दुर्दैवी घटना; कुटुंबावर शोककळा, परिसरातून हळहळ

विंग (प्रतिनिधी): शेतातील वीजपंप सुरू करण्यासाठी गेलेल्या २२ वर्षीय युवकाचा विद्युत नियंत्रण पेटीचा धक्का बसून दुर्दैवी मृत्यू झाला. विंग (ता. कराड) येथील कणसेमळा परिसरात मंगळवारी सकाळी ही हृदयद्रावक घटना घडली. वैभव कृष्णत नलवडे असे मृत युवकाचे नाव आहे. याबाबत मिळालेली माहिती अशी की, वैभव नलवडे हा सकाळी शेतातील वीजपंप सुरू करण्यासाठी गेला होता. पंपाची वीज नियंत्रण पेटी सुरू करण्यासाठी त्याने स्पर्श करताच त्याला जोरदार विजेचा धक्का बसला. यात तो जागीच कोसळला.



दरम्यान, शेतात काम करणाऱ्या एका महिलेच्या निदर्शनास हा प्रकार आला. तिने तातडीने वैभवच्या कुटुंबीयांना याची माहिती दिली. माहिती मिळताच वडील तसेच अन्य शेतकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. गंभीर अवस्थेतील वैभवला उपचारासाठी कराड येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीपूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे सांगितले.

त्यानंतर कराड येथील वेणूताई चव्हाण उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. त्यानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. मृतदेह घरी आणल्यानंतर नातेवाईक, मित्रपरिवार आणि ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली. एकुलत्या एक मुलाच्या अकाली निधनाने कुटुंबीयांचा आक्रोश हृदय पिळवटून टाकणारा होता. सायंकाळी शोकाकुल वातावरणात वैभववर अंत्यसंस्कार करण्यात आले. वैभव हा सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील तरुण होता. त्याच्या पश्चात आई-वडील आणि तीन बहिणी असा परिवार आहे. कुटुंबाचा आधार असलेल्या तरुण मुलाच्या अकाली निधनाने नलवडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, वैभवच्या मृत्यूने विंग परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# महाकाली विकास सेवा सोसायटीचा 'आनंदराव पाटील' यांच्या नावाला कौल

* जिल्हा बँक निवडणुकीसाठी बहुमताने ठराव मंजूर
* सहकार व शेतकरी हिताच्या कार्याची घेतली दखल



कराड(प्रतिनिधी): सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विजयनगर येथील महाकाली विकास सेवा सोसायटी लि.च्या सभेत आनंदराव पाटील (नाना) यांच्या नावाला बहुमताने पसंती देत ठराव मंजूर करण्यात आला. चेअरमन, व्हाइस चेअरमन, तसेच संचालक मंडळाच्या उपस्थितीत झालेल्या या निर्णयामुळे आनंदराव पाटील यांच्या नेतृत्वावर सोसायटीने विश्वास व्यक्त केला आहे.

सहकार क्षेत्रात त्यांनी केलेले उल्लेखनीय कार्य, तसेच शेतकरी हितासाठी घेतलेली भूमिका यांचा विचार करून त्यांच्या नावाने हा ठराव मंजूर करण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले. उपस्थित पदाधिकारी व सभासदांनी आनंदराव पाटील यांच्या नेतृत्वाला पाठिंबा देत सहकार क्षेत्राच्या बळकटीकरणासाठी त्यांच्या योगदानाचे कौतुक केले.

सभेस सोसायटीचे चेअरमन नवनाथ यादव, व्हाइस चेअरमन शिवाजीराव जाधव, विश्वासराव पाटील, भरत संकपाळ, दगडू यादव, शशिकांत कुमठेकर, धनंजय शीलवंत, सौ. अलका पाटील, सचिव जहीर मुल्ला यांच्यासह मुंडे गावचे माजी सरपंच आनंदराव जमाले, माजी सरपंच रमेश लवटे, विजयराव कदम, वसंतराव पाटील, दिलीपराव पाटील, नागेंद्र कोरे, माजी सरपंच संजय शीलवंत तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. व्हाइस चेअरमन शिवाजीराव जाधव यांनी आभार मानले.

# ५५ कोटींचे ॲनालॉग पनीर नष्ट, परवानेही रद्द!

मुंबई : राज्यात शाळेबाहेर सकस आहाराचे आदेश दिले आहेत, त्याचे पालन सुरू आहे. फूड सेफ्टी आयुक्तांना लोकांच्या आरोग्याच्या दृष्टीने काही काळासाठी किंवा वेळेसाठी बंदी घालण्याचे अधिकार आहेत. त्यानुसार महाराष्ट्रात ॲनालॉग पनीरवर बंदी घालण्यात आल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिले. ॲनालॉग पनीर म्हणून नॉन डेरी पनीर विकल जाते. त्याचे विपरीत परिणाम लक्षात घेऊन राज्यात ३० जुलै रोजी नोटीफिकेशन काढून उत्पादन प्रक्रिया, साठवणूक वाहतूक आणि विक्रीवर बंदी घालण्यात आली असून, ५५ कोटींचे ॲनालॉग पनीर नष्ट केल्याचे मुंढे यांनी सांगितले.

# बनवडीच्या मुख्य रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य

## अपघाताची टांगती तलवार; दुरुस्तीअभावी ग्रामस्थ त्रस्त; खड्ड्यांत वृक्षारोपणाचे आंदोलन करण्याचा इशारा

कराड (प्रतिनिधी): 'स्वच्छ, सुंदर आणि आदर्श गाव' अशी ओळख निर्माण केलेल्या बनवडी गावातील मुख्य रस्त्याची सध्या दुरवस्था झाली असून, रस्त्यावर पडलेल्या असंख्य खड्ड्यांमुळे ग्रामस्थांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

पावसामुळे या खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने त्यांचा अंदाज येत नसून, दुचाकीस्वारांसह इतर वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. रस्त्याची तातडीने दुरुस्ती न केल्यास याच खड्ड्यांमध्ये वृक्षारोपण करून प्रशासनाचे लक्ष वेधण्याचे आंदोलन छेडले जाईल, असा इशारा ग्रामस्थांनी



दिला आहे.

बनवडी गावातून जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. पावसाळ्यात परिस्थिती आणखी गंभीर झाली असून, खड्ड्यांमध्ये साचलेल्या पाण्यामुळे रस्त्याची अवस्था वाहनचालकांच्या लक्षात येत नाही. त्यामुळे दुचाकी घसरणे, वाहनांचे नुकसान होणे अशा घटना घडत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. विशेषतः विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना या रस्त्यावरून प्रवास करताना मोठी कसरत करावी लागत आहे.

खड्डे चुकविण्यासाठी वाहनचालकांना वारंवार वळणे घ्यावी लागत असल्याने वाहतुकीचा वेग मंदावतो. समोरून येणाऱ्या वाहनांचा अंदाज न आल्यास अपघात होण्याची शक्यताही निर्माण झाली आहे. रस्त्याच्या दुरवस्थेमुळे दुचाकीस्वारांना पाठीचा व मणक्याचा त्रास जाणवत असल्याच्या तक्रारीही ग्रामस्थांकडून होत आहेत.

गावाच्या विकासाची आणि स्वच्छतेची ओळख निर्माण होत असताना मुख्य रस्त्याची झालेली दुरवस्था ही प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. रस्त्याच्या देखभाल-दुरुस्तीची जबाबदारी असलेल्या संबंधित विभागांनी तातडीने पाहणी करून दर्जेदार दुरुस्ती करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. 'अपघात झाल्यानंतर प्रशासनाला जाग येण्यापेक्षा आताच रस्त्याची दुरुस्ती करा,' अशी संतप्त भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे. प्रशासनाने तातडीने कार्यवाही न केल्यास रस्त्यातील खड्ड्यांमध्ये वृक्षारोपण करून अनोख्या पद्धतीने आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# सुपने प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत लोकार्पणाच्या प्रतीक्षेत

## बांधकामाची अधिकाऱ्यांकडून पाहणी; नागरिकांना मिळणार अत्याधुनिक आरोग्य सुविधा

कराड (प्रतिनिधी): सुपने-तांबवे परिसरातील नागरिकांसाठी आरोग्यसेवेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या सुपने प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नवीन इमारतीचे बांधकाम अंतिम टप्प्यात आले आहे. सुसज्ज इमारत आणि विविध आवश्यक सुविधांनी हे आरोग्य केंद्र लवकरच नागरिकांच्या सेवेत दाखल होणार असून, त्याच्या लोकार्पणाची तयारी सुरू झाली आहे.

मंगळवारी जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता शिंदे, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग कराडचे उपविभागीय अभियंता पाटील व शाखा अभियंता भजनावले यांनी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीची पाहणी करून बांधकामाची सद्यस्थिती जाणून घेतली. यावेळी जिल्हा परिषद



सदस्य रवी ताटे, सुपने गावचे युवा नेते जगदीश पाटील, सातारा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) सेवादलाचे उपाध्यक्ष धनाजी पाटील, उपसरपंच अजित जाधव, अमित पाटील, ग्रामपंचायत सदस्य सुहास पाटील, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष राजकुमार पाटील, कंत्राटदार शहा, तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. राज्याचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण आणि पर्यटन व खनिकर्म मंत्री तथा सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या माध्यमातून मंजूर झालेल्या या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे काम आता पूर्णत्वाकडे आले आहे. आधुनिक सुविधांनी सुसज्ज असलेल्या या इमारतीमुळे सुपने-तांबवे परिसरातील नागरिकांना आरोग्याच्या मूलभूत सुविधा अधिक सुलभपणे उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना उपचारासाठी शहराकडे धाव घेण्याची गरज कमी व्हावी आणि स्थानिक पातळीवरच दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या दृष्टीने हे केंद्र महत्त्वाचे ठरणार आहे. इमारतीचे उर्वरित काम पूर्ण झाल्यानंतर लवकरच त्याचे लोकार्पण करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.